**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 26/01/2025

आरोपी लोकसेवक- श्री. शरद दयाराम पाटील, वय 40 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद- महसूल सहाय्यक, (अनधिकृत गौण खनिज उत्खनन/वाहतूक कार्यवाही पथक) नेमणुक- तहसील कार्यालय, सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) राहणार. जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून 25,000/- (पंचवीस हजार रुपये) लाचेची मागणी करुन तडजोड अंती 20000/- (वीस हजार रुपये) लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री. शरद दयाराम पाटील, वय 40 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद- महसूल सहाय्यक, (अनधिकृत गौण खनिज उत्खनन/वाहतूक कार्यवाही पथक) नेमणुक- तहसील कार्यालय, सिल्लोड, ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) राहणार. जिल्हा छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | :- | 25,000/- (पंचवीस हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | | 20,000/- (वीस हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी | :-<br>:- | श्री. केशव दिंडे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. विजय वगरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांना नदी पत्रातून अवैध वाळू काढून, वाळु वाहतूक करु देऊन, तक्रारदार यांचे ट्रॅक्टरवर कारवाई न करण्यासाठी हप्ता म्हणून महिन्याला 25,000/- (पंचवीस हजार रुपये) ची मागणी करुन तडजोडी अंती 20,000/- (वीस हजार रुपये) लाचेची मागणी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांचे ट्रॅक्टर ट्रॉली असून उपळी गावाजवळील नदी पत्रातून अवैध वाळू काढून, वाळू वाहतूक करु देऊन, तक्रारदार यांच्या ट्रॅक्टरवर कारवाई न करण्यासाठी हप्ता म्हणून महिन्याला 25,0000/- (पंचवीस हजार रुपये) लाचेची दिनांक 25/01/2025 रोजी मागणी करुन, त्यात तडजोडी अंती 20,000/- (वीस हजार रुपये) स्विकारण्याचे दिनांक 25/01/2025 रोजी पंचासमक्ष मान्य केले. मागणी केलेली लाचेची रक्कम 20,000/- (वीस हजार रुपये) पंचासमक्ष स्वत: आलोसे यांनी स्विकारली, असता आलोसे यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले असून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पो.स्टे.सिल्लोड ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक मा.श्री.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री.मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. केशव दिंडे, यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक विजय वगरे, पोलीस हवालदार सिनकर, नागरगोजे, यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

25/1/2025

( सुरेश ज्ञ. नाईकनवरे )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.